“सन २००० नंतरच्या मराठी आदिवासी साहित्यातील स्त्री जाणिवांचा चिकित्सक अभ्यास” (विशेष संदर्भ : कविता, कथा व कादंबरी वाङ्‌मय)

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयात पीएच.डी. (Ph.D)

पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक

श्री.अजय श्रीराम मुरमुरे

एम.ए., नेट (मराठी)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. यादव रघुनाथ सूर्यवंशी

मराठी विभाग,

महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर जि.लातूर

संशोधन केंद्र

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

जानेवारी २०२४

“सन २००० नंतरच्या मराठी आदिवासी साहित्यातील स्त्री जाणिवांचा चिकित्सक अभ्यास”

(विशेष संदर्भ : कविता, कथा व कादंबरी वाङ्मय)

प्रस्तावना :

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मराठी साहित्यामध्ये अपूर्व अशी एक क्रांतीच घडून आली. भारतीय राज्यघटनेने स्वीकारलेली लोकशाही तत्त्वे आणि स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा झालेला प्रसार व प्रचार यामुळे आजपर्यंत शिक्षणापासून वंचित असलेला व ज्यांचे जगणे आणि भोगणे हा साहित्याचा विषय होऊ शकला नाही असे दलित, ग्रामीण, आदिवासी, भटके-विमुक्त, स्त्री, कामगार समाजाच्या सर्व स्तरातील उपेक्षित वंचित घटक यांच्यामध्ये शिक्षणाने जागृती झाली व त्यांचे आत्मभान जागे झाले. तसेच या समाज घटकातील स्त्री पुरुष आपल्या जीवनातील ताणेबाणे, सुख-दुःख साहित्यातून व्यक्त करू लागले यामुळे मराठी साहित्याच्या कक्षा विस्तारल्या. मराठी साहित्यामध्ये नव्या जाणिवांचे साहित्य अवतीर्ण झाले. त्या साहित्याला दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, भटक्या-विमुक्तांचे साहित्य, जनवादी साहित्य या नावाने ओळखले जाऊ लागले. असे विविध वाङ्मय प्रवाह निर्माण झाले. या साठोत्तरी वाङ्मय प्रवाहामध्ये आदिवासी साहित्य हा एक महत्त्वाचा वाङ्मय प्रवाह म्हणून ओळखला जातो.

आदिवासी हा या देशाचा मूळ नागरिक असतानाही त्याला नागरीकरणाच्या नावाखाली गावा-शहरातून हकलण्यात आले. आदिवासी जमातीवर होत गेलेल्या अन्याय, अत्याचार व दुःखातून आदिवासी साहित्य निर्माण झाले. भारताच्या सर्व भागांमध्ये आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. त्या त्या भागातील आदिवासी समूहांनी आपल्या लोकसंस्कृतीतून स्वतःचे अस्तित्व कायम ठेवले आहे. भारतामध्ये सुमारे ६४५ भिन्न जमाती असून त्यापैकी महाराष्ट्रात आंध, गोंड, भिल्ल, पारधी, कोलाम, परधान, राजगोंड इत्यादी जमाती व्यतिरिक्त इतर जमाती आहेत. तसे पाहता भारतात प्राचीन काळापासून आदिवासींचे मौखिक साहित्य प्रचलित आहे. आदिवासींच्या गोंड, भिल्ल, पावरा आदी महाराष्ट्रातील जमातीतील लोकसाहित्य प्रसिद्ध आहे.

१९६० नंतर महाराष्ट्रात आदिवासी मराठी साहित्य चळवळ निर्माण झाली आहे. तसेच आदिवासी साहित्याला प्रसिध्दी देणारे अनेक नियत कालिके प्रसारित होऊ लागले. त्यामुळे अनेक लेखक व कवी उदयास आले. आदिवासी लेखकांमध्ये डॉ.विनायक तुमराम, माधव सरकुंडे, भुजंग मेश्राम, उषाकिरण दामाजी आत्राम, वाहरू सोनवणे, डॉ.मधुकर वाकोडे, डॉ.माहेश्वरी गावीत, डॉ.राजेश धनजकर, शीतल ढगे, सखाराम डाखोरे, पांडूरंग वागतकर, सुरेश धनवे आदींचा समावेश होतो.

आदिवासी कवितेमध्ये उषाकिरण आत्राम, शीतल ढगे, वंदना मोरे, भुजंग मेश्राम, डॉ. विनायक तुमराम, वाहरू सोनवणे, डॉ.सखाराम डाखोरे, सुरेश धनवे, पांडूरंग वागतकर, आदी प्रमुख कवी असून कथा कादंबरीच्या क्षेत्रात माधव सरकुंडे, उषाकिरण आत्राम, विश्राम वळवी, डॉ.पुष्पा गावित, बाबाराव मडावी, अलाम कुसुम, डॉ.मधुकर वाकोडे यांचे लेखन महत्त्वाचे ठरते. १९६० ते १९८० हा आदिवासी साहित्याचा पहिला टप्पा मानला, तसेच १९८० ते २००० हा दुसरा टप्पा मानता येईल तर २००० ते २०२० हा आदिवासी साहित्याचा तिसरा टप्पा मानता येऊ शकतो. प्रस्तुत संशोधनासाठी **"सन २००० नंतरच्या मराठी आदिवासी साहित्यातून आलेल्या स्त्री जाणिवा : एक अभ्यास"** (विशेष संदर्भ : कविता, कथा व कादंबरी वाङ्मय) हा विषय निवडलेला असून वरील पार्श्वभूमीवर मराठी आदिवासी साहित्याचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या २००० नंतरच्या कालखंडातील मराठी आदिवासी साहित्यातून आलेल्या स्त्री जाणिवांचा अभ्यास करून संशोधनाअंती आलेले निष्कर्ष येथे मांडण्यात येणार आहेत.

विषय निवडी मागची भूमिका :

मी स्वतः आदिवासी असल्याने आदिवासींच्या जीवनाविषयी मला अधिक आस्था आणि जिव्हाळा असून आदिवासींचे जीवन साहित्यातून कशाप्रकारे चित्रित झालेले आहे हे जाणून घेण्याचा व त्याचा अभ्यास करण्याचा माझा विशेष प्रयत्न राहिलेला आहे. पीएच.डी.च्या संशोधनासाठी मी पात्र ठरल्यानंतर पीएच.डी.चे संशोधन हे आदिवासी साहित्यावर करावे असे मला मनोमन वाटत होते. तसेच आपल्या या संशोधनातून आदिवासींचे जीवन प्रकाशात येईल. आदिवासी समाजाविषयी काही विशेष कार्य करण्याची संधी प्राप्त होऊ शकेल म्हणून मी **"सन २००० नंतरच्या मराठी आदिवासी साहित्यातून आलेल्या स्त्री जाणिवा : एक अभ्यास"** (विशेष संदर्भ : कविता, कथा व कादंबरी वाङ्मय) असा विषय संशोधनासाठी घेतलेला आहे.

आदिवासी साहित्यातून कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथने इत्यादी साहित्य प्रकारातून अनेक आदिवासी लेखकांनी स्त्री जीवनविषयक चित्रण केलेले आहे. त्या त्या लेखकांच्या साहित्यातून आलेल्या स्त्री जाणिवांचे अध्ययन करून संशोधन करण्याचा प्रयत्न करणार आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्टये :

१) आदिवासी साहित्याचे स्वरूप व संकल्पना समजून घेणे.

२) सन २००० नंतरच्या काळातील आदिवासी साहित्यातून आलेल्या स्त्री जाणिवांचा शोध घेणे.

३) मराठी आदिवासी कवितेतून आलेल्या स्त्री जाणिवांचे वेगळेपण अभ्यासणे.

४) मराठी आदिवासी कथेतून आलेल्या स्त्री जाणिवांचे वेगळेपण अभ्यासणे.

५) मराठी आदिवासी कादंबरी वाङ्मयातून आलेल्या स्त्री जाणिवांचे वेगळेपण अभ्यासणे.

गृहितकृत्ये :

१) मराठी आदिवासी साहित्यामध्ये सन २००० नंतरच्या काळामध्ये विविध वाङ्मय प्रकारातून साहित्य निर्मिती झालेली आहे.

२) सन २००० नंतरच्या काळातील आदिवासी साहित्यातून स्त्री जाणीवेचे साहित्य निर्माण झालेले आहे.

३) आदिवासी साहित्यातून आलेल्या स्त्री जाणिवांचे स्वरूप हे विविधांगी स्वरूपाचे आहे.

४) आदिवासी साहित्यातून आलेल्या स्त्री जाणिवांनी मराठी साहित्यामध्ये वेगळी भर घातलेली आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत याचा उपयोग करून निरीक्षणात्मक, विश्लेषणात्मक व वर्णनात्मक अभ्यास पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाच्या मर्यादा:

१) प्रस्तुत संशोधन हे आदिवासी साहित्याशी संबंधित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे सन २००० नंतरच्या काळातील आदिवासी साहित्याशी संबंधित आहे.

३) प्रस्तुत संशोधन हे आदिवासी साहित्यातून आलेल्या स्त्री जाणिवेशी संबंधित आहे.

४) प्रस्तुत संशोधन हे सन २००० नंतर प्रकाशित झालेल्या आदिवासी कविता ,कथा व कादंबरी या साहित्याशी संबंधित राहील.

संशोधन प्रकरणाची रुपरेषा:

१) आदिवासी साहित्य संकल्पना, स्वरूप व वाटचाल.

२) आदिवासी कविता वाङ्मयातून आलेल्या स्त्री जाणिवा.

३) आदिवासी कथा वाङ्मयातून आलेल्या स्त्री जाणिवा.

४) आदिवासी कादंबरी वाङ्मयामधून आलेल्या स्त्री जाणिवा.

५) निष्कर्ष व उपसहार

प्रकरण पहिले : आदिवासी साहित्य : संकल्पना व स्वरूप

मराठी साहित्यामध्ये जे विविध वाङ्मय प्रकार उदयाला आले त्यात वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मय प्रकार म्हणजे आदिवासी साहित्य होय. आदिवासी जीवनाविषयी व आदिवासी बोलीतून लिहिलेले साहित्य आदिवासी साहित्य म्हणून ओळखले जाते. प्रस्तुत प्रकरणामध्ये आदिवासी साहित्याची संकल्पना व आदिवासी साहित्याचे स्वरूप अभ्यासण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : आदिवासी कविता वाङ्मयातून आलेल्या स्त्री जाणिवा.

साठोत्तरी काळानंतर १९८० नंतर मराठी आदिवासी साहित्य विविध प्रकारात समृद्ध झाले. त्यात कविता हा प्रांत अत्यंत महत्त्वाचा आहे. मराठी साहित्यात आदिम जीवनाचे संचित घेऊन आलेली ही कविता आदिवासींच्या अस्तित्वासाठी व अस्मितेसाठी चळवळ उभी करून समाजाचे लक्ष वेधून घेणारी ही कविता अत्यंत महत्त्वाची ठरते. प्रस्तुत प्रकरणामध्ये आदिवासी कविता साहित्यातून सन २००० नंतर आलेल्या स्त्री जाणिवाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : आदिवासी कथा वाङ्मयातून आलेल्या स्त्री जाणिवा.

मराठी आदिवासी कथा साहित्य समृद्ध आहे. या कथा साहित्यातून आदिवासी जमातींच्या सामाजिक, आर्थिक, व्यावहारिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक जीवनाचा आणि संस्कृती प्रचलनाचा अनुभव येतो. सन २००० नंतर मराठी साहित्यात आदिवासी कथा साहित्याने मोठी भर घातली आहे. आदिवासी जीवनात झालेल्या बदलांची व त्यांच्या जीवन जाणिवांची नोंद या कथांनी घेतलेली आहे. तेव्हा प्रस्तुत प्रकरणामध्ये सन २००० नंतरच्या आदिवासी कथा वाङ्मयातून आलेल्या स्त्री जाणिवांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : आदिवासी कादंबरी वाङ्मयांमधून आलेल्या स्त्री जाणिवा.

आदिवासी समाज जीवनाला केंद्रबिंदू माणून अलीकडच्या काळातील अनेक लेखकांनी कादंबरी लेखन केले आहे. मराठी आदिवासी कादंबरी साठोत्तरी काळात आलेली असली तरी १९८० नंतर तिचा विकास झालेला आहे. सन २००० नंतरच्या आदिवासी समाजाचं जीवनचित्रण करणाऱ्या आदिवासी

कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये सन २००० नंतरच्या आदिवासी कादंबरी वाङ्मयातून आलेल्या स्त्री जाणिवांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : निष्कर्ष व उपसहार

या प्रकरणात आदिवासी साहित्याचा अभ्यास करत असताना सन २००० नंतरच्या मराठी आदिवासी साहित्यातून प्रकट झालेल्या स्त्री जाणिवा स्पष्टपणे अधोरेखित करून संशोधनातून हाती आलेले महत्त्वाचे निष्कर्ष मांडण्यात येणार आहेत.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) डॉ. विनायक तुमराम — “बोली भाषेतील आदिवासी कविता” साहित्य अकॅडमी, न्यू दिल्ली, प्रथमावृत्ती २०२१

२) डॉ.पुष्पा गावीत - आदिवासी संस्कृती भाषा आणि साहित्य, अथर्व पब्लिकेशन, जळगाव

३) वाहरू सोनवणे - “गोधड” कवितासंग्रह, सुगावा प्रकाशन ,पुणे, प्रथम आवृत्ती २००६

४) डॉ. माहेश्वरी गावीत -“आदिवासी जीवनाविष्कार” आनंदोत्सव प्रकाशन, अहमदनगर, प्रथमावृत्ती २०१८

५) विनायक तुमराम - “शतकातील आदिवासी कविता”

६) आदिवासी साहित्य : संकल्पना, स्वरूप व वाटचाल - संपादक डॉ. शिवलिंग मेनकुदळे, अविष्कार प्रकाशन, प्रथमावृत्ती २०२१

७) विनायक तुमराम - आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन,

८) माधव सरकुंडे - आदिवासी अस्मितेचा शोध, देवयानी प्रकाशन, यवतमाळ

९) प्रभू राजगडकर - “निवडुंगाला आलेली फुलं” (मूळ कलाकृती) कवितासंग्रह, प्रनील प्रकाशन, चंद्रपूर, प्रथमवृत्ती २०१२

१०)	डॉ.माहेश्वरी गावीत - आदिवासी साहित्य, आनंदोत्सव प्रकाशन, अहमदनगर, प्रथमावृत्ती २०११

११)	अलाम कुसुम - ‘‘रान पाखरांची माय’’ (कवितासंग्रह) कुसुम अलाम, अल्लापल्ली प्रकाशन, गडचिरोली, प्रथमावृत्ती २०००.

१२)	डॉ.मुनघाटे प्रमोद - संपा. ‘‘आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या’’ प्रतिभा प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००७.

संशोधक

श्री. अजय श्रीराम मुरमुरे
एम.ए., नेट (मराठी)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. यादव रघुनाथ सूर्यवंशी
मराठी विभाग
महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर जि.लातूर